Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक २५] गुरुवार ते बुधवार, जुलै ३०-ऑगस्ट ५, २०२६/श्रावण ८-१४, शके १९४८ [पृष्ठे ८ , किंमत : रुपये ११.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १५६.

### नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक - १३ जुलै, २०२६

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६.**

### आदेश

टिपीएस-२२२६-२५७-प्र.क्र.१०१-२०२६-नवि- ९.–

ज्याअर्थी, चंद्रपूर - बल्लारपूर विभागाच्या प्रादेशिक योजनेत निर्देशित केल्यानुसार नवनगर क्षेत्राचे (यापुढे “उक्त क्षेत्र” असे संबांधले आहे) सुयोग्य पध्दतीने नियोजन होवून विकास करण्यासाठी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे (यापुढे “उक्त अधिनियम” असे संबोधले आहे) कलम ४०(१) (ब) नुसार शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र.टिपीएस-२२८४-१८२३-प्र.क्र.१०५-नवि-९, दिनांक २० डिसेंबर, १९८८ अन्वये महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणास “विशेष नियोजन प्राधिकरण” म्हणून घोषीत करण्यात आले आहे. या क्षेत्रासाठीची विकास योजना, शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२२९४-४७१-प्र.क्र.१५९-नवि-९, दिनांक ३० जून, १९९८ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक १ सप्टेंबर, १९९८ पासून अंमलात आली आहे (यापुढे “उक्त विकास योजना” असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये, मौजा कोसारा येथील सर्व्हे क्र. १२ मधील ०.७१ हेक्टर जागा (यापुढे “उक्त जमीन’ असे संबोधिले आहे) “सामाजिक वनीकरण” करीता (यापुढे “उक्त आरक्षण” असे संबोधिले आहे) आरक्षित असुन उक्त आरक्षणाचे समुचित प्राधिकरण म्हणून नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास महामंडळ, नागपूर हे आहेत (यापुढे “उक्त विशेष नियोजन प्राधिकरण” असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त विशेष नियोजन प्राधिकरणाने उक्त आरक्षणाखालील जागा, उक्त विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून दहा वर्षाच्या कालावधीत संपादन केली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या मालकांनी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) नुसार उक्त विशेष नियोजन प्राधिकरणावर उक्त आरक्षणासंदर्भात उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) अन्वये दिनांक २७ जुलै, २०२२ रोजी सूचना बजावली आहे (यापुढे " उक्त सूचना" असा उल्लेख केलेला आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावल्यानंतरही उक्त विशेष नियोजन प्राधिकरणाने, विहित कालावधीत उक्त जमीन संपादन केली नाही अथवा त्या संपादन करण्यासंबंधीची उक्त अधिनियमाचे कलम १२६ (४) सह, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिध्द केली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या मालकांनी मा. मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे रिट याचिका क्र. २०८४/२०२५ दाखल केली असून सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिनांक ३० मार्च, २०२६ रोजी अंतिम निर्णय पारीत केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावल्यापासून, उक्त विशेष नियोजन प्राधिकरणाने विहित कालावधीत उक्त जमीन संपादन केली नाही अथवा उक्त जमीन संपादन करण्यासंबंधीची, उक्त अधिनियमाचे कलम १२६ (४) सह भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिध्द केलेली नाही. त्यामुळे या परिस्थितीत उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) मधील तरतुदीनुसार, उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले असल्याचे शासनाचे मत झाले आहे;

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) नुसार प्राप्त अधिकारात राज्य शासन, उक्त विकास योजनेतील, मौजे कोसारा, ता. जि. चंद्रपूर मधील सर्व्हे क्र.१२ मधील, खालील परिशिष्टात नमूद केल्यानुसार ०.७१ हेक्टर क्षेत्रावरील "सामाजिक वनीकरण" हे आरक्षण व्यपगत झाल्याचे अधिसूचित करीत आहे व अशाप्रकारे उक्त आरक्षणातून मुक्त झालेली जमीन, संबंधित जमीनमालकास उक्त विकास योजनेतील लगतच्या अनुज्ञेय भूवापराप्रमाणे अन्यथा अनुज्ञेय असलेल्या विकासाकरीता उपलब्ध होईल;

**परिशिष्ट**

| अनु. क्र. | मौजा, तालुका व जिल्हा | सूचनेअंतर्गत सि.स.क्र./ सर्व्हे क्र./ खसरा क्रमांक | विकास योजनेतील प्रस्ताव | आरक्षणातून व्यपगत झालेले क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | मौजे कोसारा ता. जि. चंद्रपूर | सव्हे क्र.१२ | " सामाजिक वनीकरण " | क्षेत्र ०.७१ हेक्टर आर |

प्रस्तुत आदेशान्वये उक्त आरक्षणामधून व्यपगत झालेले क्षेत्र दर्शविणाऱ्या भाग नकाशाची प्रत मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळ, गृहनिर्माण भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात आली आहे.

सदरचे आदेश महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** (कायदे / नियम) या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**कुणाल मेमाणे,**
कार्यासन अधिकारी.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १५७.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai - 400 032, Date 13th July, 2026

THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966

*ORDER*

No.TPS-2226-527-C.R.101-2026-UD-9.—

Whereas, the Government of Maharashtra *vide* Urban Development Department's Notification No.TPS-2284-1823-C.R.105-UD-9, dated 20th December, 1988, has appointed Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) to be "Special Planning Authority" under the provision of section 40(*1*)(*b*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maha. Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") to undertake planned and orderly development of the notified area of New Chandrapur, as proposed in the sanctioned Regional Plan of Chandrapur-Ballarpur Region and the Government *vide* Urban Development Department's Notification No. TPS-2294-471-CR-159-UD-9, dated 30th June, 1998, has sanctioned the Development Plan for the aforesaid Notified Area which has come into force with effect from 1st September, 1998 (hereinafter referred to as "the said Development Plan");

And whereas, in the said Development Plan, the land area admeasuring 0.71 Hectare bearing Survey No.12, of Mouja Kosara (hereinafter referred to as "the said Land") is reserved as "Social Forestry" (hereinafter referred to as "the said Reservation") and the Appropriate Authority for the said Reservation is Maharashtra Housing & Area Development Authority (hereinafter referred to as "the said Special Planning Authority");

And whereas, the said Land under the said Reservation has not been acquired by the said Special Planning Authority within ten years from the date on which the said Development Plan has come into force;

And whereas, the Owners of the said Land, had served a notice dated 27th July, 2022 under Section 127(*1*) of the said Act, to the said Special Planning Authority, also being the Appropriate Authority (hereinafter referred to as "the said Notice");

And whereas, even after service of the said Notice as aforesaid, the said Land had neither been acquired, within prescribed time period nor the Notification of land acquisition required under section 126(*4*) of the said Act, read with Section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013, has been published by the said Special Planning Authority within prescribed time period from the date of the service of said Notice;

And whereas, the owners of the said Land, have filed Writ Petition No. 2084/2025 before the Hon'ble Bombay High Court, Nagpur Bench, Nagpur and the final order dated 30th March, 2026 is passed by the Hon'ble High Court;

And whereas, it is observed that, the said Land had neither been acquired, within prescribed time period from the date of service of Notices, nor Notification of land acquisition required under section 126(*4*) of the said Act, read with section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013, been published within prescribed time period by the said Special Planning Authority and in consequence thereof, the Government

of Maharashtra is of opinion that, the said Reservation on the said Land, stands lapsed as per the provisions of section 127(*1*) of the said Act;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*2*) of section 127 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, as mentioned in the Annexure below, hereby notifies that, the said Reservation *i.e.* "Social Forestry" as specified in the said Development Plan stands lapsed to the extent of area admeasuring 0.71 Hectare bearing Survey No.12 of Mauja Kosara, Tal. Dist. Chandrapur and the area so released will be available to the owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Development Plan.

SCHEDULE

| Sr. No. | Mouja, Taluka & District | City Survey No./ Survey No./ Gut No./Khasara No. mentioned in Notice | Reservation of Development Plan | Area lapsed from reservation |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1 | Mouja Kosara, Tal. Dist. - Chandrapur | Survey No.12 | "Social Forestry" | 0.71 Hectare |

1) A Copy of the part plan showing the area which is lapsed vide this Order is available in the office of the Chief Officer, Nagpur Housing and Area Development Authority, Housing Building, Civil Lines, Nagpur during office hours on all working days for inspection of public up to one month.

2) This order shall also be available on the Government website. at *www.urban.maharashtra.gov.in*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

KUNAL MEMANE,

Section Officer.

-----

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १५८.

## मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक रानप-नगररचना-मप्रवगर-२२६३-२०२६–

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (ज्याचा उल्लेख यापुढे "सदर अधिनियम" असा करण्यात आला आहे) च्या कलम ५३ च्या पोट-कलम (८) अन्वये प्राप्त झालेल्या आणि या संदर्भात समर्थ करणाऱ्या इतर

सर्व अधिकारांचा वापर करून, रामटेक नगर परिषद ही रामटेक नागरी क्षेत्रासाठी “नियोजन प्राधिकरण” (Planning Authority) असल्याने, याद्वारे सोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यांना, सदर अधिनियमाचे कलम ५३, कलम ५४, कलम ५५ आणि कलम ५६ अन्वये नियोजन प्राधिकरणाच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी, त्यांच्यासमोर स्तंभ (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या स्थानिक अधिकार क्षेत्राच्या मर्यादेत “पदनिर्देशित अधिकारी” (Designated Officers) म्हणून घोषित करीत आहे.

ही अधिसूचना शासकीय राजपत्रात (Official Gazette) प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अमलात येईल.

**अनुसूची**

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे पदनाम | स्थानिक अधिकार क्षेत्राची मर्यादा |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | रचना सहाय्यक ( Planning Assistant), नगर परिषद रामटेक. | रामटेक नगर परिषदेच्या संपूर्ण नगर पालिका हद्दीतील क्षेत्र. |
| २ | शहर अभियंता (स्थापत्य) श्रेणी-ब (City Engineer Civil Grade B ), नगर परिषद रामटेक. | रामटेक नगर परिषदेच्या संपूर्ण नगर पालिका हद्दीतील क्षेत्र. |
| ३ | कनिष्ठ अभियंता श्रेणी - क ( Junior Engineer Grade C), नगर परिषद रामटेक. | रामटेक नगर परिषदेच्या संपूर्ण नगर पालिका हद्दीतील क्षेत्र. |

**व्यावृत्ती आणि निरंतरता कलम (Savings and Continuity Clause):**

या अधिसूचनेत काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापूर्वी नियोजन प्राधिकरणाद्वारे किंवा पूर्वीच्या कोणत्याही प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे सदर अधिनियमांतर्गत जारी केलेली कोणतीही नोटीस, आदेश किंवा दिशा-निर्देश पूर्णपणे वैध आणि कायदेशीर राहतील. तथापि, या दिनांकापूर्वी सुरू झालेले सर्व चालू कायदेशीर खटले, न्यायालयीन बाबी, सुनावणी आणि अंमलबजावणीच्या प्रलंबित कारवाया यापुढे नवीन पदनिर्देशित अधिकारी (Designated Officers) यांच्याद्वारेच चालवल्या आणि पूर्ण केल्या जातील. हे पदनिर्देशित अधिकारी अशा सर्व जुन्या व प्रलंबित प्रकरणांमध्ये पुढील आवश्यक कायदेशीर कारवाई करण्यास सक्षम व उत्तरदायी राहतील.

रामटेक नगर परिषदेच्या आदेशान्वये व नावाने,

**पल्लवी नंदा दिलीप राऊत,**
मुख्याधिकारी,
नगर परिषद, रामटेक.

रामटेकः
दिनांक २२ जुलै, २०२६.

-------

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १५९.

BY CHIEF OFFICER, MUNICIPAL COUNCIL

*NOTIFICATION*

No. RMC-TP-MRTP-2263-2026 .–

In exercise of the powers conferred by sub-section (*8*) of Section 53 of the Maharashtra Regional and Town Planning Act. 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as “the said Act”), and all other powers enabling it in this behalf, the Ramtek Municipal Council, being the Planning Authority for the urban area of Ramtek, hereby designates the officers specified in column (*2*) of the Schedule appended hereto to be the “ Designated Officers ” for the purposes of exercising the powers of the Planning Authority under Section 53, Section 54, Section 55, and Section 56 of the said

Act, within the local area of jurisdiction specified against them in column (3) of the said Schedule.

This notification shall come into force with effect from the date of its publication in the *Official Gazette*.

SCHEDULE

| Sr. No. | Designation of the Officer | Local Area of Jurisdiction |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| 1. | Planning Assistant, Municipal Council Ramtek. | Whole area within the municipal limits of the Ramtek Municipal Council. |
| 2. | City Engineer (Civil) Grade B, Municipal Council Ramtek. | Whole area within the municipal limits of the Ramtek Municipal Council. |
| 3. | Junior Engineer (Civil) Grade C, Municipal Council Ramtek. | Whole area within the municipal limits of the Ramtek Municipal Council. |

**Savings and Continuity Clause:**

Notwithstanding anything contained in this notification, any notice, order or direction issued under the said Act by the Planning Authority or any previously authorized officer prior to the date of publication of this notification shall remain valid and legal. However, all ongoing legal matters, court cases, hearings, and enforcement actions initiated prior to this date shall henceforth be processed, conducted, and executed by the newly appointed Designated Officers. The designated officers shall assume full jurisdiction and authority to pursue all such pending and ongoing matters to their legal conclusion.

By order and in the name of Ramtek Municipal Council,

PALLAVI NANDA DILEEP RAUT,
Chief Officer,
Municipal Council, Ramtek.

Ramtek:
Dated the 22nd July, 2026.

**पुढील अधिसुचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकाला प्रसिध्द झालेली आहे.**

---

२८

---

**शुक्रवार, जुलै ११, २०२५/आषाढ २०, शके १९४७**

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १८८

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**आदेश**

क्रमांक कार्या-१०-नविशा-कार्यसन-१-२५८-२०२५.–

महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती (अध्यक्ष निवडणूक) (सुधारणा) नियम, २००९ मधील नियम ७ (क) अन्वये मला प्राप्त अधिकाराचा वापर करुन मी, विनय गौडा जी सी, जिल्हाधिकारी, चंद्रपूर या प्रगटनाद्वारे असे जाहीर करतो की, **दिनांक ०८ जुलै, २०२५** रोजी झालेल्या **जिवती** नगरपंचायतीच्या विशेष सभेत खालील अनुसूचित दर्शविलेले उमेदवार अध्यक्ष म्हणून निवडून आलेले आहेत.

**अनुसूची**

| अ. क्र. | नगरपंचायतीचे नाव | निवडून आलेल्या अध्यक्षांचे नाव | शेरा (जर राखीव असेल, तर कुणासाठी) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | जिवती | राठोड अनुसया पंढरी | खुला (महिला) |

**विनय गौडा जी सी,**
जिल्हाधिकारी, चंद्रपूर.

चंद्रपूर :
दिनांक १० जुलै, २०२५.

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १८९.

BY COLLECTOR

*ORDER*

No. Desk-10-UDB-Karyasan-1-258-2025.—

In exercise of the power delegated to me as per Rule 7 (*C*) of the Maharashtra Municipal Councils, *NagarPanchayats* ( President Election ) (Amendment) Rules, 2009. I, Vinay Gowda G C, Collector,Chandrapur District hereby publish the name of person who has been declared elected as President of **Jiwati** *Nagarpanchayat* in the Special Meeting, held on 08th July, 2025 shown in below schedule.

SCHEDULE

| Sr. No. | Name of *NagarPanchayat* | Name of the Elected President | Remark (Whether the Post is reserved, if so for whom) |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1 | Jiwati | Rathod Anusaya Pandhari | Open ( Female ) |

Chandrapur :

Dated the 10th July, 2025.

VINAY GOWDA G C ,

Collector, Chandrapur.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR SMT. MANISHA KUMBHAR.